RANE PRAKASHAN PRIVATE LIMITED
शब्दांना सत्याची धार
प्रहार

पाटकर-वर्दे महाविद्यालयाकडून

विद्यार्थ्यांना डिजिटल सुरक्षिततेचे धडे

मुंबई : वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी गोरेगाव (पश्चिम) येथील आदर्श विद्यालय मराठी माध्यममध्ये क्विक हील फाऊंडेशन आणि पाटकर-वर्दे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. हा उपक्रम क्विक हील फाऊंडेशनच्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या अभियानांतर्गत राबविण्यात आला.

'माझा डेटा, माझी जबाबदारी' या संकल्पनेवर आधारित या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवण्याचे महत्त्व, इंटरनेटचा जबाबदारीने वापर आणि ऑनलाइन फसवणुकीपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. पाटकर-वर्दे महाविद्यालयाचे प्रशिक्षित विद्यार्थी सायबर वॉरियर्स वेदांत रलाकर गोसावी आणि साहिल संजय ढेबे यांनी संवादात्मक पद्धतीने सत्र घेतले. डेटा संरक्षण, ऑनलाइन फसवणूक, सोशल मीडिया वापर, मजबूत पासवर्ड आणि सायबर गुन्ह्यांची तक्रार याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारून शंकांचे निरसन करून घेतले. आदर्श विद्यालयाच्या प्रतिनिधींनी क्विक हील फाऊंडेशन आणि पाटकर-वर्दे महाविद्यालयाच्या विद्यार्थी सायबर वॉरियर्सच्या उपक्रमाचे कौतुक केले. यातून विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल जबाबदारी सायबर सुरक्षेची जाणीव निर्माण झाल्याचे आयोजकांनी सांगितले.